# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२३

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### आंबेगाव बुद्रुक आणि आंबेगाव खुर्द (जि.पुणे) विभागाचे पुणे महानगरपालिका बांधकाम विभागाचे कनिष्ठ अभियंता आणि उप अभियंता यांनी केलेला गैरव्यवहार

**(१) ३२६४२ (२३-११-२०२१). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील आंबेगाव बुद्रुक आणि आंबेगाव खुर्द विभागाचे पुणे महानगरपालिका बांधकाम विभागाचे कनिष्ठ अभियंता आणि उप अभियंता यांच्या माध्यमातून गैरव्यवहार सुरु असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांच्या अखत्यारीत असलेल्या आंबेगाव बुद्रुक आणि आंबेगाव खुर्द हद्दीमध्ये अनधिकृत बांधकामे रोखण्याच्या कर्तव्यात कसूर करून अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्याच्या हेतूने नोटीसा देऊन आर्थिक संगनमताने त्यामागे घेतल्या जात असल्याचे प्रमाण या भागात सर्वाधिक असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाची होणारी फसवणूक लक्षात घेता स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी त्यांच्या विरोधात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार संबंधितांविरुद्ध शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. एकनाथ शिंदे (२०-०६-२०२३)** (१) नाही.

(२) नाही.

(३) होय.

(४) चौकशीत कोणताही गैरव्यवहार झालेला अथवा केलेला नसल्याचे निदर्शनास आल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### बीड जिल्ह्यातील गेवराई नगर परिषद अंतर्गत (जि.बीड) सुसज्ज नाट्यगृहाच्या बांधकामासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२) ३३३५५ (०२-०२-२०२२). श्री.लक्ष्मण पवार (गेवराई) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यातील गेवराई नगर परिषद अंतर्गत सुसज्ज नाट्यगृहाच्या बांधकामासाठी लागणाऱ्या रुपये ०४ कोटी ०६ लक्ष ४७ हजार ६०८ च्या खर्चास जिल्हाधिकारी, बीड यांनी मान्यता दिली असून एकूण अपेक्षित खर्च रक्कमेपैकी ०२ कोटी ७० लाख रुपये शासन निधी, १० टक्के नगरपरिषद स्वहिस्सा म्हणजे ३० लक्ष रुपये व १ कोटी ०६ लक्ष ४७ हजार ६०८ रुपये नगरपरिषदेला प्राप्त होणाऱ्या वैशिष्ट्यपूर्ण योजनेतून खर्च करावा असे जिल्हाधिकारी बीड यांनी नाट्यगृहासाठी दिलेल्या प्रशासकीय मान्यतेतून निदशर्नास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासननिधी व नगरपरिषद स्वहिस्सा असे ०३ कोटी रुपयांचे नाट्यगृहाचे काम पूर्ण झाले असून तसे उपयोगिता प्रमाणपत्र (यु.सी.) नगरपरिषद गेवराईने शासनास सादर केलेले आहे. परंतु मागील दोन वर्षापासून गेवराई नगरपरिषदेस वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत शासनाकडून कोणताच निधी न मिळाल्यामुळे उर्वरित रुपये १ कोटी ०६ लक्ष ४७ हजार ६०८ चे काम निधी अभावी अपूर्ण असून नाट्यगृहाचे काम अर्धवट अवस्थेत बंद पडल्याचे निदशर्नास येत आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, गेवराई नगरपरिषद अंतर्गत बांधण्यात येणाऱ्या सुसज्ज नाट्यगृहाचे अर्धवट काम पूर्ण करण्यासाठी लागणाऱ्या १ कोटी ०६ लक्ष ४७ हजार ६०८ रुपयांची गेवराई परिषदेची मागणी पूर्ण करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-०६-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) गेवराई नगरपरिषद, जि. बीड यांच्या दिनांक ३०.०९.२०२१ रोजीच्या प्रस्तावानुसार "वैशिष्ट्यपुर्ण" योजनेंतर्गत "नाट्यगृह बांधकाम" या कामासाठी रुपये ५.०६ कोटी इतक्या खर्चास मान्यता देऊन शासन हिस्स्याचे उर्वरित रुपये १.५६ कोटी निधी शासन निर्णय दिनांक ०३ ऑक्टोबर, २०२२ अन्वये वितरीत करण्यात आला आहे.

---

### नायगाव, उमरी व धर्माबाद (जि.नांदेड) या तीनही नगरपालिका क्षेत्रात नाट्यगृह व सभागृह उभारण्याबाबत

**(३) ३३६५७ (११-०१-२०२२). श्री.राजेश पवार (नायगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्ह्यातील नायगाव, उमरी व धर्माबाद या तीनही नगरपालिका क्षेत्रात विविध सांस्कृतिक कार्यक्रमांकरीता नाट्यगृह व सभागृहाची आवश्यकता असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नायगाव तालुका परिसरात एकही मोठे नाट्यगृह वा सभागृह नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यामुळे सांस्कृतिक कार्यक्रमांकरीता तिन्ही नगरपालिका क्षेत्रात भव्य असे नाट्यगृह उभारण्याची मागणी होत आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०१-०६-२०२३) :** (१) नायगाव नगरपंचायत व धर्माबाद नगरपरिषद क्षेत्रात सांस्कृतिक कार्यक्रमांकरीता नाट्यगृह व सभागृहाची आवश्यकता आहे, हे खरे आहे.

तथापि, उमरी नगरपरिषद क्षेत्रात पूरक सभागृह उपलब्ध असल्याने, सांस्कृतिक कार्यक्रमाकरीता नाट्यगृह व सभागृहाची आवश्यकता नाही.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### परभणी (जि.परभणी) येथील नटराज रंगमंदिर या नाटयगृहासाठी निधी उपलब्ध करण्याबाबत

**(४) ३४७८३ (०२-०२-२०२२). श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी (जि.परभणी) येथील नटराज रंगमंदिर या नाटयगृहाची दूरवस्था झाल्याचे माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू नाटयगृहाच्या दुरुस्तीकरिता मा.नगरविकास मंत्री यांनी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत दिलेल्या आश्वासनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-०६-२०२३) :** (१) होय हे खरे आहे
(२) सदर नाट्यगृहास महानगरपालिका पायाभूत सोयी सुविधा योजनेंतर्गत मंजूर अर्थसंकल्पिय निधी, प्राप्त मागण्या यांचा विचार करुन निधी वितरणाची कार्यवाही करण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही

---

## महाराष्ट्र अग्निशमन सेवा व संचालनालयाकडून एजन्सींना परवाना दिला असून भंडाऱ्यासह ९ जिल्हयांमध्ये एकही परवानाधारक एजन्सी नसल्याबाबत

**(५) ३४८८५ (२७-१२-२०२२). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अग्निशमन यंत्रणा बसविण्यासाठी दर्जेदार यांत्रिकी सामग्री उपलब्ध व्हावी याकरिता महाराष्ट्र अग्निशमन सेवा व संचालनालयाकडून एजन्सींना परवाना दिला असून भंडाऱ्यासह ९ जिल्हयांमध्ये एकही परवानाधारक एजन्सी नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०६-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.
नागपूर व अमरावती विभागातील भंडारा, गोंदिया, वर्धा, गडचिरोली, बुलढाणा, यवतमाळ व वाशिम या ७ जिल्ह्यांमधून लायसन्स एजन्सीसाठी विहीत अटींची पूर्तता करणाऱ्या कंपन्यांचे अर्ज महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालयास प्राप्त न झाल्यामुळे सदर ७ जिल्ह्यांमध्ये अग्निशमन यंत्रणा बसविण्यासाठी संचालनालयाकडून परवाना देण्यात आला नाही.
(२) व (३) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ च्या कलम ९ आणि महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना नियम,२००९ च्या नियम १२, १३, १४ व १५ अन्वये राज्यात इमारतींना अग्निशमन यंत्रणा बसविण्याकरीता एजन्सींना लायसन्स देण्याचे अधिकार मुख्य अग्निशमन अधिकारी व संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा यांना देण्यात आले आहेत.

नागपूर व अमरावती विभागातील सदर अटींची पूर्तता करणाऱ्या नागपूरमधील ४०, चंद्रपूरमधील ३, अमरावतीमधील १ आणि अकोल्यामधील १ अशा एकूण ४५ एजन्सींना अग्निशमन यंत्रणा बसविण्यासाठी परवाना देण्यात आला आहे. इमारतींना अग्निशमन यंत्रणा बसविण्याकरीता एजन्सींना परवाना देण्याकरीता अग्निशमन संचालनालयाच्या संकेतस्थळावर अर्जाचा नमुना व परवानाधारक एजन्सींची यादी देखील उपलब्ध आहे.

महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना नियम, २००९ मधील नमूद अटींची पूर्तता करणाऱ्या राज्यातील कोणत्याही जिल्ह्यातील कंपन्यांनी अग्निशमन संचालनालयाकडे अर्ज सादर केल्यास अर्हता प्राप्त कंपन्यांना परवाना देण्यात येतो.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पिंपळनेर (ता.साक्री.जि. धुळे) या ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीमध्ये रूपांतर करण्याबाबत**

**(६) ३९५४९ (०१-०४-२०२२). श्रीमती मंजुळा गावीत (साक्री) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपळनेर (ता.साक्री.जि. धुळे) या ग्रामपंचायतीचे नगरपंचायत मध्ये रूपांतर करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे वारंवार केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने ग्रामपंचायतीचे नगरपंचायत मध्ये रूपांतर होणेबाबत आतापर्यंत कोणती निर्णयात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, सदरहू प्रकरणी सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०५-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्याकडून प्राप्त निवेदनांच्या अनुषंगाने परिपूर्ण प्रस्ताव/अहवाल सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, धुळे यांना दि.२५.०२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. त्यानुषंगाने, जिल्हाधिकारी स्तरावर कार्यवाही सुरु असल्याबाबत जिल्हाधिकारी, धुळे यांनी अहवाल सादर केला आहे.

---

**चाळीसगाव (जि.जळगांव) नगरपरिषद आस्थापनेवर बांधकाम विभाग व नगररचना विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(७) ३९७१२ (१९-०४-२०२२). श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाळीसगाव (जि.जळगांव) नगरपरिषद आस्थापनेवर बांधकाम विभागाकरिता ४ अभियंत्यांची पदे मंजूर आहेत, त्याचप्रमाणे नगररचना विभागासाठी ३ पदे मंजूर असूनही सर्व पदे आजमितीपर्यंत रिक्त असून माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये शासनाकडून केवळ बांधकाम विभागासाठी एका अभियंत्याची बदलीने पदस्थापना करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चाळीसगाव नगरपरिषदेची लोकसंख्या आज सुमारे १ लक्ष २५ हजाराच्या वर असुन चाळीसगाव नगरपरिषदेसाठी शासनाने भुयारी गटार योजना व पाणीपुरवठा योजना मंजूर केलेली असून कामे प्रगतीपथावर होती, परंतु आजमितीस नगरपरिषदेमध्ये अभियंत्याचे पद भरले नसल्याने सदरील विकासात्मक कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, नगररचना विभागाचे कोणतेही काम होत नसल्याने नागरिकांच्या रोषाला स्थानिक लोकप्रतिनिधींना सामोरे जावे लागत आहे, त्यामुळे या मोठ्या योजनांकरिता तसेच नगररचना विभागासाठी अभियंत्यांची पदे त्वरीत व प्राधान्याने भरणे आवश्यक असल्याने येत्या आठ दिवसात सदरची पदे भरण्यात यावीत, अन्यथा नाईलाजास्तव आंदोलनात्मक भूमिका स्वीकारावी लागेल याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास मा.नगर विकास मंत्री व प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांना लेखी पत्रान्वये विनंती केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०५-२०२३) :** (१) हे अंशतः खरे आहे.

चाळीसगाव नगरपरिषदेकरिता राज्यस्तरीय संवर्गातील स्थापत्य अभियंत्यांची एकूण ६ पदे मंजूर असून, त्यापैकी श्रेणी-अ च्या पदावर नगरपरिषद प्रशासन संचालनालयाच्या दि.०१.१०.२०२१ रोजीच्या बदली आदेशान्वये एका अभियंत्याची नियुक्ती करण्यात आली असून उर्वरित ५ पदे रिक्त आहेत.

(२) चाळीसगाव नगरपरिषदेच्या मंजूर भुयारी गटार योजना व पाणीपुरवठा योजनेची कामे प्रगतीपथावर असून, पाणीपुरवठ्याचे काम अंतिम टप्प्यात आहे.

तसेच बांधकाम विभागातील स्थापत्य अभियंता श्रेणी-अ व पाणीपुरवठा विभागातील पाणीपुरवठा अभियंता श्रेणी-ब या पदावर अभियंत्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

(३) हे खरे आहे.

सदर प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या निवेदनाच्या अनुषंगाने नियमोचित कार्यवाहीबाबत आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांना दि.१७.११.२०२१ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(४) महाराष्ट्र नगरपरिषद राज्य स्तरीय सर्व संवर्गातील ५० टक्के पदे रिक्त असल्याने, ती भरण्याकरीता मान्यता मिळण्याबाबतचा प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही सुरु असल्याबाबत नगरपरिषद प्रशासन संचालनालयाने अहवाल सादर केला आहे.

सहायक नगर रचनाकार, श्रेणी-१ संवर्गातील १३८ रिक्त पदे भरण्याकरीता उमेदवार उपलब्ध करुन देण्याबाबत महाराष्ट्र लोकसेवा आयोगास केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने दि.२८.०१.२०२२ रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे.

तसेच रचना सहायक (गट-ब/ अराजपत्रित) या तांत्रिक संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही करण्याबाबत संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना दि. १६.०९.२०२१ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले असून, त्याबाबतची कार्यवाही नगररचना संचालनालयाच्या स्तरावर सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील अवर्षणग्रस्त गावांमध्ये छोटया नद्या, ओढे, नाले यावर बंधारे बांधून भूजल पातळी वाढविण्यासाठी संबंधीत यंत्रणाना निधी देणेबाबत**

**(८) ४१८५३ (०१-०४-२०२२). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अवर्षणग्रस्त गावांमध्ये छोटया नद्या, ओढे, नाले यावर बंधारे बांधून भूजल पातळी वाढण्याच्या उद्देशाने सामाजिक वनीकरण किंवा तत्सम यंत्रणांकडे आवश्यक निधी देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले तद्अनुषंगाने सदर प्रकरणी भूजल पातळीत वाढ करण्यासाठी सामाजिक वनीकरण किंवा संबंधीत यंत्रणाना निधी देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०६-२०२३) :** (१) व (२) जलयुक्त शिवार अभियान २.० हे शासन निर्णय दि.३/१/२०२३ अन्वये सुरू करण्यात आले असून यामध्ये अभिसरणाद्वारे कामे करण्यात येणार आहेत. सदर अभियानांतर्गत सद्यस्थितीत क्षेत्रिय स्तरावर गाव निवड व त्याअनुषंगाने कामांचे नियोजन सुरू आहे. जलयुक्त शिवार अभियान २.० मध्ये सामाजिक वनीकरण अथवा तत्सम यंत्रणांनी छोटे नद्या/ओढे /नाले यावर बंधारे बांधण्याच्या अनुषंगाने निधी मागणी केल्यास सदर यंत्रणांना शासन निर्णय दि.३/१/२०२३ मधील तरतुदीनुसार निधी उपलब्ध करून देण्याचे नियोजन आहे.

सदर यंत्रणांना शासन निर्णय दि.३/१/२०२३ मधील तरतुदीनुसार निधी उपलब्ध करुन देण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शिंदखेडा (जि.धुळे) तालुक्यात छत्रपती शिवाजी महाराज यांचे अश्वारूढ स्मारक उभारण्याबाबत**

**(९) ४१९१७ (१८-०४-२०२२). श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिंदखेडा (जि.धुळे) तालुक्यात हिंदवी स्वराज्याचे संस्थापक तथा महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी

महाराज यांचे अश्वारूढ स्मारक उभारण्याबाबतची मागणी शहरातील विविध संघटनांनी मुख्याधिकारी, नगरपंचायत शिंदखेडा यांच्याकडे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिंदखेडा शहरात मोठया प्रमाणावर शिवप्रेमी तसेच आजुबाजूच्या शेकडो गावांमधील ग्रामस्थांनी देखील यासाठी पाठिंबा दिला आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने शिंदखेडा शहरात छत्रपती शिवाजी महाराज यांचे अश्वारूढ स्मारक उभारण्यासाठी आवश्यक त्या परवानग्या देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०५-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) शिंदखेडा नगरपंचायतीच्या दिनांक २८ फेब्रुवारी, २०२२ रोजीच्या सर्वसाधारण सभेत छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पुतळा उभारण्यासंबंधी ठराव मंजूर झाला असून, विविध कार्यालयांच्या आवश्यक परवानग्या मिळविण्याबाबतची कार्यवाही जिल्हाधिकारी स्तरावर सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मातीतील अतिसूक्ष्म प्लास्टिक कणांमुळे जमिनीचे प्रदूषण होत असल्याबाबत

**(१०) ४४५७० (१७-०९-२०२२). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) "टॉक्सिक्स लिंक" या स्वयंसेवी संस्थेने केलेल्या अभ्यासात महाराष्ट्रातील जमिनीत विघटन न होणाऱ्या प्लास्टिकच्या वापरामुळे मातीतील अतिसूक्ष्म प्लास्टिक कणांचे प्रमाण वाढल्याचे माहे मे २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कमी घनतेच्या प्लास्टिकचे ५०% विघटन करणारी बुरशी संशोधकांनी शोधली असून सदरील तंत्रज्ञान वापरात आणण्यासाठी शासन विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-०४-२०२३) :** (१) "टॉक्सिक्स लिंक" (Micro plastic inagricultural Soil बाबतचा ) या स्वयंसेवी संस्थेचा अहवाल त्यांच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.
(२) व (३) उपरोक्त टॉक्सिक्स लिंकच्या अहवालामध्ये विघटनशील मल्चिंग फिल्म वापरण्याबाबत नमूद केलेले आहे. केंद्र शासनाचे मार्गदर्शक सूचनेनुसार जमिन आरोग्य पत्रिका कार्यक्रमांतर्गत माती तपासणी करताना १२ घटकांची तपासणी केली जाते. यामध्ये जमिनीचा सामू, क्षारता, सेंद्रिय कर्ब, नत्र, स्फुरद, पालाश, गंधक, जस्त, बोरॉन, लोह मँगनीज व तांबे इत्यादी घटकाची तपासणी केली जाते. यामध्ये मातीतील अतिसूक्ष्म प्लास्टिक कणाचा समावेश नाही.

महाराष्ट्र राज्यात इतर राज्यांच्या तुलनेत सर्वात जास्त वापर वाढत चालल्याने विघटन न होणाऱ्या प्लास्टिकच्या वापराने जमिनीतील मातीत प्लास्टिकच्या वापराने जमिनीतील सर्वेक्षण कृषि विद्यापीठात झालेले नाही. तसेच कमी घनतेच्या प्लास्टिकचे विधटन करणाऱ्या बुरशी बाबतचे संशोधनही कृषि विद्यापीठात यापूर्वी झालेले नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**केंद्र पुरस्कृत भारत सरकार मेट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेच्या ४० टक्के भाग राज्य शासनाला भरण्याबाबत**

**(११) ४४६६१ (०६-१०-२०२२). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र पुरस्कृत भारत सरकार मेट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेच्या वितरणासंदर्भात नुकताच निर्णय जाहीर झाल्याने ४० टक्के भार राज्य शासनाला उचलावा लागणार असल्याचे बाब माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाकडून शिष्यवृत्तीमध्ये दरवर्षी कपात करण्यात येत असल्यामुळे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळत नसल्याच्या तक्रारी विद्यार्थ्यांमार्फत करण्यात येत आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती व गुणवत्ता वाढीसाठी भारत सरकारच्या सामाजिक न्याय विभागामार्फत सन, १९५९ पासून राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीमध्ये कपात करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, विद्यार्थ्यांना नियमित व वेळेत शिष्यवृत्ती मिळण्याबाबत शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करुन कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-०६-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंबाजोगाई (जि. बीड) नगरपरिषदेमध्ये कारखाना फिल्टर हाऊस येथील विहिरीतील गाळ काढण्याच्या कामात केलेला गैरव्यवहार**

**(१२) ४५२५२ (२५-०९-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज)** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई (जि.बीड) येथील नगरपरिषदेमध्ये कुठल्याही प्रकारचे ई-टेंडर न काढता दरपत्रकाचा तुलनात्मक तक्ता तयार करून त्याच्या अंदाजपत्रकास महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची तांत्रिक मान्यता घेणे बंधनकारक असतानासुद्धा अशा प्रकारची कुठलीही मान्यता न घेता, तसेच शहरातील विहिरीतील गाळ काढण्याचे दरपत्रक मागवून कार्यादेश ही त्याप्रमाणे देण्यात आले. मात्र वास्तवात कारखाना फिल्टर हाऊस येथील विहिरीतील गाळ काढण्याचे जास्तीत जास्त २-३ लाख रुपयांच्या कामाचे तब्बल १८,८५,३१५/- रुपयांची देयके नगरपरिषद मुख्याधिकारी व नगराध्यक्ष यांनी अदा करून शासनाच्या लाखो रुपयांचा गैरव्यवहार केला असल्याबाबत तक्रारी करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याअनुषंगाने सदर प्रकरणी उपआयुक्त, नगरपरिषद प्रशासन शाखा, औरंगाबाद यांनी सदर प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेत व त्यांनी सादर केलेल्या अभिलेख्याचे अवलोकन करून सदर कामात गंभीर आक्षेप नोंदवत निरिक्षणावरुन प्रस्तुत कामात प्रशासकीय व वित्तीय अनियमितता झाल्याचे स्पष्ट करत सदर अनियमिततेबाबत जबाबदारी निश्चित करुन संबंधितावर कारवाई करण्याबाबत दिनांक ६ जून, २०२२ रोजी जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे अहवाल पाठवला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास जिल्हाधिकारी, बीड यांनी वरील गंभीर प्रकरणी प्रशासकीय व वित्तीय अनियमितता झाल्याचे अहवालात स्पष्ट असल्याने, संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून शासनाने कोणती कठोर कारवाई केली वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०५-२०२३) :** (१) हे खरे आहे,

अशा आशयाची दि. ०८.०७.२०२१ रोजीची तक्रार जिल्हाधिकारी कार्यालयास प्राप्त झाली आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी संबंधित अधिकारी / कर्मचारी यांच्याविरुद्ध विभागीय चौकशी प्रस्तावित करण्याबाबत विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांनी सादर केलेला प्रस्ताव त्रोटक स्वरुपाचा असल्याने व सदर प्रस्तावात काही त्रुटी असल्याने, विहित नमुन्यात सविस्तर विभागीय चौकशीचा परिपूर्ण प्रस्ताव सादर करण्याबाबत विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना दि.१३.०९.२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परभणी शहरातील नाट्यगृह, बसपोर्ट आणि महिला रुग्णालयाच्या इमारतींची बांधकामे निधीअभावी प्रलंबित असल्याबाबत**

**(१३) ४५५५९ (२५-०९-२०२२). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी शहराचा नाट्यगृह, बसपोर्ट आणि महिला रुग्णालयाच्या इमारतींची बांधकामे निधीअभावी प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर इमारतींचे बांधकाम पूर्ण होण्यासाठी आवश्यक असलेला निधी उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव संबंधित विभागाकडून शासनाकडे सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, इमारतींचे बांधकाम पूर्ण होऊन ज्या उद्दीष्टाकरीता या इमारती मंजूर करण्यात आल्या ती उद्दीष्टे पूर्ण करुन त्याचा उपयोग शहरातील नागरीकांना व्हावा यासाठी शासनाने पुरेसा निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-०६-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे
(२) होय, खरे आहे
(३) व (४) परभणी शहराच्या प्रलंबित नाट्यगृहाच्या कामासाठी रुपये ११.७५ कोटी निधीची मागणी केली आहे.
महानगरपालिका पायाभूत सोयीसुविधा अंतर्गत मंजूर अर्थसंकल्पिय निधी,प्राप्त मागण्या यांचा विचार करुन निधी वितरणाची कार्यवाही करण्यात येते.

---

**वरणगाव (ता.भुसावळ, जि.जळगांव) नगरपालिका येथे वाढीव पाणी पुरवठा योजनेचे काम पूर्ण होईपर्यंत नागरिकांना शुध्द पाणी वेळेवर देण्याबाबत**

**(१४) ४६९०३ (१०-११-२०२२). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वरणगाव (ता.भुसावळ, जि.जळगांव) नगरपालिका हद्दीत पाणीपुरवठा माहे मे, २०२२ च्या दरम्यान ८ ते १० दिवसाआड होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ८ ते १० दिवसांनी होणारा पाणीपुरवठा अशुध्द असून त्यासंबंधी नागरिकांनी तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने वरणगाव नगरपालिका हद्दीत वाढीव पाणीपुरवठा योजनेचे काम पूर्ण होईपर्यंत नागरिकांना शुध्द पाणी वेळेवर देण्यासाठी नगरपालिकेमार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०५-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

(३) वरणगाव नगरपरिषदेच्या नविन वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या संथगतीने होणाऱ्या कामाबाबत सविस्तर आढावा जिल्हाधिकारी स्तरावर घेण्यात आला असून, संबंधित मक्तेदाराने उर्वरित काम जलदगतीने पूर्ण करण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम आखुन संबंधित मक्तेदाराकडून मुदतीत काम पूर्ण करुन घेण्याबाबत, तसेच सदर काम विहित मुदतीत पुर्ण न केल्यास, मक्तेदारास काळया यादीत टाकण्याबाबत कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, जळगाव यांना आदेशित केले आहे.

(४) जलशुद्धीकरण केंद्रावर ब्लिचिंग पावडर / तुरटीचा नियमित वापर केला जातो. नागरिकांना अशुद्ध पाणीपुरवठा होऊ नये म्हणून वेळोवेळी कनिष्ठ वैज्ञानिक अधिकारी, जळगाव यांच्याकडून पाणी नमुना तपासणी केली जाते. तसेच पाणी पुरवठा जलवाहिनीमध्ये गळती असल्यास त्वरीत दुरुस्त केली जाते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वरणगाव (ता.भुसावळ, जि.जळगांव) नगरपरिषद हद्दीतील सांडपाणी कुठलीही प्रक्रिया न करता भोगावती नदीत सोडत असल्याबाबत

**(१५) ४६९३५ (२५-०९-२०२२). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरणगाव (ता.भुसावळ, जि.जळगांव) नगरपरिषद हद्दीतील सांडपाणी कुठलीही प्रक्रिया न करता भोगावती नदीत सोडण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी स्थानिक नागरिकांकडून वारंवार तक्रारी करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी नगरपालिकेमार्फत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०५-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

नगरपरिषदेकडे प्राप्त तक्रारींचे निवारण करण्याकरीता सदर तक्रारी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे पाठविण्यात आल्या आहेत.

(३) वरणगाव नगरपरिषद हद्दीतील महाराष्ट्र जिवन प्राधिकरणामार्फत कार्यान्वित असलेल्या ग्रामपंचायतकालीन सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पामधून सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याचे काम ठेकेदाराकडून करण्यात येते. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने प्रकल्पातील दोष दूर करुन, आवश्यक ठिकाणी रोपे लावण्याबाबत ठेकेदारास निर्देश दिले आहेत.

तसेच नगरपरिषदेमार्फत नविन भूमिगत गटार योजना व सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पाकरीता सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## फैजपूर (ता.यावल, जि.जळगाव) येथील नगरपालिकेतील आरोग्य विभागात साहित्य खरेदीत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१६) ४७१०९ (१०-११-२०२२). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) फैजपूर (ता.यावल, जि.जळगाव) येथील नगरपालिकेतील आरोग्य विभागात लाखो रुपये किमतीच्या साहित्य खरेदीत झालेल्या गैरव्यवहार प्रकरणी फैजपूर पोलीस स्टेशन व वरिष्ठांकडे तक्रार देऊन दोन महिने उलटूनही दखल न घेतल्याने प्रशासनाच्या भूमिकेविषयी परिसरात नाराजी व्यक्त करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित अधिकारी व मक्तेदार यांचेवर शासनाने कोणती कायदेशीर कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०५-२०२३) :** (१) अशा आशयाची तक्रार जिल्हाधिकारी, जळगाव यांच्या कार्यालयास दि.०९ मे, २०२२ रोजी ईमेलद्वारे प्राप्त झाली आहे, हे खरे आहे.
(२) व (३) सदर तक्रारीच्या अनुषंगाने अर्जदार व संबंधित अधिकारी व कर्मचारी यांची चौकशी करण्यात आली असून, चौकशीअंती जबाबदारी निश्चित करुन पुढील प्रशासकीय कार्यवाही जिल्हाधिकारी, जळगांव यांच्या स्तरावर सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे जिल्ह्यातील पीएमपीएमएल मधील कंत्राटी कर्मचाऱ्यांना थकीत वेतन वेतन अदा करण्याबाबत**

**(१७) ४९५४३ (१८-०१-२०२३). श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्ह्यात चार महिन्यांपासून कंत्राटदाराकडे थकीत असलेले वेतन तातडीने मिळावे या मागणीसाठी पीएमपीएमएलमध्ये कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांनी दिनांक २५ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्या सुमारास काम बंद आंदोलन करून बेमुदत संपावर जाण्याचा निर्णय घेतला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी कंत्राटी कामगारांच्या मागणीनुसार एकंदरीत रकमेचा तपशिल काय आहे तसेच दीर्घकालावधीसाठी वेतन अदा न करण्यामागची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने माहिती घेऊन पीएमपीएमएलच्या वतीने कोणत्या स्वरुपाची उपाययोजना तसेच कंत्राटदारांना थकीत वेतनाच्या रकमा त्वरीत अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-०५-२०२३) :** (१) पुणे महानगर परिवहन महामंडळाकडील खाजगी बस ठेकेदारांकडील स्वारगेट, नतावाडी व निगडी आगारातील कंत्राटी कर्मचा-यांनी दि.२४/०८/२०२२ व दि.२५/०८/२०२२ रोजी थकीत वेतनापोटी संप केला होता.
२)

| ठेकेदाराचे नांव | कंत्राटी कर्मचा-यांचे मासिक वेतनाचा सर्वसाधारण खर्च रुपये (माहे जुलै २०२२) |
|---|---|
| मे.एमपी इन्टरप्रायजेस ॲन्ड असोसिएटस लि. | २६,८३,९१३ |
| मे. ओलेक्ट्रा ग्रीनटेक लि. | ५३,८७,३६९ |
| मे.ईवे ट्रान्स प्रा.लि | ५९,३७,१०३ |
| एकूण | १,४०,०८,३८५ |

पीएमपीएमएल मार्फत विलंब झालेला नसुन संबंधित ठेकेदार यांचेकडुन विलंब झालेला आहे.
(३) करारानुसार वेतन अदा करणेची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदार यांची आहे.
संबंधित ठेकेदारांनी दि.२४/०८/२०२२ व दि.२५/०८/२०२२ रोजी अचानक बसेसचा पुरवठा न केल्यामुळे त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावून संबंधित ठेकेदारांवर करारातील अटी-शर्तीनुसार बसेस बंद बाबतच्या दंडाची आकारणी करणेत आलेली आहे. तसेच संपाचे दिवशी अन्य आगारांकडून सदरचे तीन आगारांकडे बसेस वर्ग करुन प्रवासी संचलन करणेत आलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही

---

**पिंपरी.चिंचवड (जि.पुणे) महानगरपालिकेच्या यंशवतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात शवविच्छेदन झाल्यानंतर मृतदेहाची अदलाबदल केल्याबाबत**

**(१८) ५०१७३ (२०-०१-२०२३). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) महानगरपालिकेच्या यंशवतराव चव्हाण स्मृती (वायसीएम) रुग्णालयात स्नेहलता अशोक गाायकवाड व मीना बाळू गाडे या दोन महिलांचे दिनांक १९ ऑक्टोबर, २०२२ रोजी शवविच्छेदन करण्यात आले मात्र शवविच्छेदन झाल्यानंतर मृतदेहाची अदलाबदल करून त्यांच्या नातेवाईकांना मृतदेह देण्यात आले असल्याची बाब दिनांक २० आक्टोबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गंभीर प्रकारानंतर महिलेच्या नातेवाईकांनी संताप व्यक्त करून रुग्णालयाची तोडफोड केली आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०६-२०२३) :** (१) होय. सदरची घटना ही पिंपरी चिंचवड महापालिकेच्या पोस्टमार्टेम सेंटर येथे घडली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) मृतदेहाच्या अदलाबदलीच्या घटनेसंदर्भात अतिरिक्त आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. सदर चौकशी समितीने सादर केलेल्या अहवालानुसार दोषी व्यक्तींवर कारवाई करण्यात आली आहे. त्यामधे BVG इंडिया प्रा.लि. च्या कर्मचाऱ्यास कामावरून कमी करण्यात आले आहे, तर महानगरपालिकेच्या स्थायी आस्थापनेवरील कर्मचाऱ्याची पोस्टमार्टम विभागातून बदली करण्यात आली असून त्याची विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे.

तसेच तोडफोड प्रकरणी अधिष्ठाता, यांनी दि.२०/१०/२०२२ रोजी पिंपरी पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल केली असून त्यानुसार पोलिस विभागाने अदखलपात्र गुन्हा दाखल केला असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सडक/अर्जुनी (जि.गोंदिया) येथील रमाई घरकुल योजनेतील मंजूर घरकुलांचे पैसे लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा होण्यास विलंब होत असल्याबाबत**

**(१९) ५०४७९ (२४-०१-२०२३). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्हयातील सडक व अर्जुनी तालुक्यातील रमाई घरकुल योजनेतील मंजुर घरकुलांचे पैसे लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा होण्यास विलंब होत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित गटविकास अधिकारी यांनी विभागाकडे पैसा जमा झाल्याचे मान्य केले आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, रमाई घरकुल योजनेतील लाभार्थ्यांचे पैसे जमा होण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी संबंधित विभागास सुचित केले असतांनाही पैसे जमा न झाल्याने चौकशी करण्याबाबत विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले वा त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०६-२०२३) :** (१), (२ ) व (३) हे खरे नाही.
(४) सन २०१६-१७ ते २०२१-२२ या कालावधीत रमाई आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत पंचायत समिती सडक अर्जुनी, जि.गोंदिया यांना एकूण १३६४ घरकुलांचे उद्दीष्ट मंजुर असून १२३९ इतक्या घरकुलाना मंजूरी देण्यात आली आहे. यापैकी ८६१ घरकुले पूर्ण करण्यात आली असून ४१८ घरकुले प्रगती पथावर आहेत. मंजूर घरकुलांचे बांधकामाकरीता टप्याटप्याने निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे जिल्ह्यातील डोंबिवली शहरात नागरिकांसाठी सुलभ शौचालय व स्नानगृह सुरू करण्याबाबत

**(२०) ५०६८८ (२०-०१-२०२३). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यातील डोंबिवली शहरात नागरिकांच्या सुविधेसाठी मोठ्या प्रमाणात सुलभ शौचालय व स्नानगृह सुरू करण्यात आले मात्र सुलभ शौचालय व स्नानगृह सुविधेत ठरलेल्या दरापेक्षा जास्त दर घेत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्नानगृह मोफत असताना पैसे आकारले जात असून अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या या आर्थिक लुटीवर कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे कोणतेही नियंत्रण नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार सदरहू दर निश्चित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०५-०६-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.
• कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील डोंबिवली विभागात फ, ग, ह, आय व ई या प्रभागात एकूण १८१ वस्ती शौचालये आहेत.
• त्यापैकी ९ शौचालये पैसे द्या व वापरा तत्त्वावर परिचालनाकरिता देण्यात आलेले आहेत. याव्यतिरिक्त बी.ओ.टी. तत्त्वावर ३ शौचालये बांधण्यात आलेले आहेत.
• परिचालन करणाऱ्या संस्थेस महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या दरानुसार दर आकारून परिचालन करण्यात येते.
• याबाबत कोणतीही लेखी तक्रार महानगरपालिकेस प्राप्त झाली नसल्याचे, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात अनुसूचित जमाती प्रवर्गाच्या उमेदवारांचा शासकिय नोकऱ्यांमध्ये पदांची संख्या वाढवण्याबाबत

**(२१) ५१२६९ (१८-०१-२०२३). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अनुसूचित जमाती प्रवर्गाच्या उमेदवारांची सरकारी नोकऱ्यांमधील पदांची संख्या वाढवण्यासाठी राज्य शासनाने ज्येष्ठ निवृत्त सनदी अधिकाऱ्यांची समिती गठीत केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या समितीला आवश्यक कार्यालय, मनूष्यबळ व साहित्य उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे,

(३) असल्यास, या समितीच्या शिफारशी शासनास प्राप्त झाल्या आहेत काय, त्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-०६-२०२३) :** (१) अनुसूचित जमाती प्रवर्गाच्या उमेदवारांचा सरकारी नोकऱ्यांमधील पदांची संख्या वाढवण्यासाठी राज्य शासनाने ज्येष्ठ निवृत्त सनदी अधिकाऱ्यांची समिती गठित केलेली नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील ऊसतोड कामगार पाल्यांची वसतिगृहे सुरू करणेबाबत**

**(२२) ५१४३१ (१८-०१-२०२३). श्री.धनंजय मुंडे (परळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य वसतिगृह विभागाच्या वतीने कै.लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार महामंडळाच्यावतीने ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी वसतिगृह चालवली जातात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ऊसतोड कामगारांच्या मुलांना शिक्षणासाठी मोफत वसतिगृहे निर्माण करण्यासाठी संत भगवानबाबा शासकीय वसतिगृह योजना सुरू करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या योजनेतून घोषित करण्यात आलेली २० वसतिगृहे अद्याप सुरू झालेली नसून वसतिगृह सुरू करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले आहे, त्यानुषंगाने ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी वसतिगृहे सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-०६-२०२३) :** (१) होय.
(२), (३) व (४) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय, दिनांक १५.६.२०२१ अन्वये स्थलांतरीत ऊसतोड कामगारांच्या मुलामुलींसाठी संत भगवानबाबा शासकीय वसतिगृह योजना सुरू करण्यात आलेली आहे.

या योजनेतून पहिल्या टप्प्यात मंजूर करण्यात आलेल्या २० वसतिगृहांपैकी ११ वसतिगृहे भाडे तत्वावरील इमारतीत सुरू करण्यात आली असून उर्वरीत ९ वसतिगृहासाठी भाडे तत्वावरील इमारतीची जागा ताब्यात घेवून येत्या शैक्षणिक वर्षापासून वसतिगृहे प्रत्यक्ष सुरू करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळातील वर्ग-४ च्या पात्र उमेदवारांना खात्याअंतर्गत लिपीक टंकलेखक पदावर पदोन्नती देण्याबाबत**

**(२३) ५१९६६ (२३-०१-२०२३). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या ठराव क्र.२०१८:१२:१९ व दि ३१.१२.२०१८ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार चालक,वाहक,सहाय्यक तसेच शिपाई व तत्सम संवर्गातील कर्मचा-यांना लिपीक-टंकलेखक संवर्गामध्ये खात्यांतर्गत पदोन्नती देण्याबाबत रा.प.महामंडळाच्या विविध विभागात संदर्भिय परिपत्रकानुसार पात्र व सेवाजेष्ठ उमेदवाराची यादी जाहिर केल्यानंतरही अनेक विभागात नियुक्त्या देण्यात आलेल्या नाहीत त्यामुळे पात्र उमेदवारांना लिपीक टंकलेखक पदापासून वंचित रहावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या चालक,वाहक,सहाय्यक तसेच शिपाई व तत्सम संवर्गातील वर्ग-४ कर्मचा-यांना लिपीक टंकलेखक पदी खात्याअंतर्गत पदोन्नती देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०१-०६-२०२३) :** (१), (२) व (३) लिपीक पदावरील पदोन्नतीची कार्यवाही नियमानुसार दरवर्षी ऑगस्ट महिन्यांपर्यंत पूर्ण करण्याबाबत सर्व विभागांना सूचना प्रसारीत करण्यात आलेल्या आहेत.

लिपीक-टंकलेखक पदावरील जागेच्या रिक्ततेनुसार चालक,वाहक,सहाय्यक तसेच शिपाई व तत्सम संवर्गातील कर्मचाऱ्यांना लिपिक-टंकलेखक संवर्गामध्ये खात्यांतर्गत पदोन्नती प्रचलीत धोरणानुसार विभाग/घटक स्तरावर देण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

## पुणे शहर आणि लगतच्या जिल्ह्यातील आंतरजातीय विवाह योजनेंतर्गत मुंबई विभागासह सात जिल्हयातील पात्र लाभार्थ्यांना अनुदान मिळण्याबाबत

**(२४) ५२०२३ (१८-०१-२०२३). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.माधवराव पवार (हदगाव), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्री.संजय सावकारे (भुसावळ), राहुल पाटील (परभणी), लहू कानडे (श्रीरामपूर), अश्विनी जगताप (चिंचवड), कृष्णा गजबे (आरमोरी), सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्यावतीने जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागामार्फत ५० हजार रुपयांचे अनुदान देण्यात येत असून मुंबई विभागासह सात विभागातील ९ हजार ९३६ आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोडप्यांचा प्रस्ताव कोरोना काळात मागील दोन वर्षापासून प्रलंबित असून लाभार्थ्यांना अनुदान मिळाले नसून त्यासाठी ४९ कोटी ६८ लाख रुपये इतक्या निधीची आवश्यकता असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई विभागासह सर्व जिल्हा परिषदांच्या समाजकल्याण विभागाकडून शासनास प्राप्त झालेल्या ९ हजार ९३६ जोडप्यांचे प्रस्ताव संबंधित विभागांनी मंजूर करुन त्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी शासनाकडे केलेली असून राज्यातील कोणत्याही जिल्हा परिषदेला अद्यापही अनुदान प्राप्त झाले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सन २०१९-२०२०,२०२०-२०२१ व २०२१-२०२२ या कालावधीतील पात्र लाभार्थ्यांना अनुदान अदा करण्यास किती कालावधी लागणार आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुंषगाने अनुदान वितरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३१-०५-२०२३) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे,
(३) सन २०१९ - २०२० ते २०२१-२०२२ या तीन वर्षात एकूण १३३४२ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे.

सदयस्थितीत सन २०२२-२३ या आर्थिक वर्षासाठी केंद्र हिस्सा ५०% रु. १२.८३,०४,०००/-(अक्षरी बारा कोटी त्र्याहत्तर लाख चार हजार फक्त) इतका निधी दिनांक १३.०३.२०२३ च्या पत्रान्वये मंजूर करण्यात आला आहे. सदर निधी सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात आंतरजातीय विवाह (जिल्हा परिषद) योजनेंतर्गत प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.
(४) व (५) प्रश्न उदभवत नाही.

---

**कळमेश्वर (जि.नागपूर) तालुक्यातील कळमेश्वर -ब्राम्हणी पाणी पुरवठा योजनेच्या सुधारीत प्रस्तावास निधीसह मंजुरी मिळणेबाबत**

**(२५) ५२५३६ (२२-०१-२०२३). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळमेश्वर (जि.नागपूर) तालुक्यातील महाराष्ट्र सुवर्ण जंयती नगरोत्थान महाअभियानांतर्गत कळमेश्वर-ब्राम्हणी पाणी पुरवठा योजनेच्या रूपये ४६५६.६२ लक्ष किंमतीच्या कामास दिनांक २८ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानंतर वस्तू व सेवा करांमध्ये (GST) १८ टक्के वाढ, मजीपप्राचे नवीन दरसुचीमध्ये HDPE पाईपच्या दरात २६ ते ३० टक्के आणि ईतर कामात ८ ते १० टक्के वाढ झाल्याने या पाणीपुरवठा योजनेचा रु.१४.०३६ कोटीच्या सुधारित अंदाजपत्रकास मंजुरी मिळणेसाठी आयुक्त नगरपरिषद प्रशासन संचालनालय, बेलापूर नवी मुंबई यांच्याकडे दिनांक २७ सप्टेंबर, २०२२ रोजी पाठविण्यात आले आहे, हे खरे आहे काय

(३) असल्यास, या पाणीपुरवठा योजनेच्या सुधारित अंदाजपत्रकास निधीसह प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे व त्यास किती दिवसात मंजुरी देण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०२-०६-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.

(२) व (३) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत कळमेश्वर शहराच्या रुपये ४६.५७ कोटी किंमतीच्या पाणीपुरवठा प्रकल्पास दिनांक २८ डिसेंबर, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यात आली होती.

दरम्यानच्या कालावधीत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सुधारित दरसूचीस अनुसरून व नगरपरिषद प्रशासन संचालनालयाने शासनास सादर केलेल्या प्रस्तावास अनुसरून कळमेश्वर शहराच्या रुपये ६०.९३ कोटी किंमतीच्या पाणीपुरवठा प्रकल्पास दिनांक २७ फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्ह्यातील १३३० मागासवर्गीय घरकुलाची यादी प्रलबित असल्याबाबत.**

**(२६) ५२६०३ (१८-०१-२०२३). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनामार्फत "सर्वांसाठी घरे" ही योजना राबवली जात असताना, मागासवर्गीय घटकांसाठी रमाई आवास योजनेअंतर्गत अमरावती जिल्ह्यातील उद्दिष्ट प्राप्त १३३० घरकुलांची यादी प्रलंबित असल्याचे माहे ऑक्टोबर,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी प्रलंबित असलेल्या १३३० घरकुला ेना मंजूरी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०६-२०२३) :** (१) व (२ ) हे खरे नाही.

सन २०२१-२२ मध्ये अमरावती जिल्ह्याकरीता ४६४५ उद्दीष्ट निश्चित करण्यात आले आहे. यापैकी ३२२३ पात्र घरकुलांना अगोदर मंजूरी प्रदान करण्यात आली आहे. उर्वरित १४२२ घरकुलांना दि.११.०१.२०२३ रोजी मंजूरी प्रदान करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे शहरातील कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी पिंपरी सांडस येथील जागेत नवीन प्रकल्प सुरू करण्याबाबत

**(२७) ५२६६४ (२२-०१-२०२३). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी पिंपरी सांडस येथील १९ हेक्टर जागेत नवीन प्रकल्प सुरू करण्यासाठी वन विभागाने महानगरपालिकेला मंजूरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेने पिंपरी सांडस येथील जागेच्या मोबदल्यात तुळापूर येथील पन्नास एकर जागा वनविभागाला दिल्यानंतरही, पिंपरी सांडस येथील प्रकल्प कार्यान्वित झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने माहिती घेऊन नवीन प्रकल्प सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०६-२०२३) :** (१) वनविभागाने प्राथमिक मंजुरी दिलेली आहे. अंतिम मंजुरी मिळाली नसल्याने अद्याप जागा ताब्यात आलेली नाही.

(२) होय

(३) व (४) पुणे महानगरपालिकेमार्फत वनविभागास रु.२,२४,९९,०७४/- सन २०१८ पर्यंत अदा करण्यात आलेले आहेत व फरकाची रक्कम रु.१,२१,३५,२१२/- अदा करण्याची प्रक्रिया सुरु आहे. तसेच पुणे मनपामार्फत जागा ताब्यात घेण्यासाठी पाठपुरावा करण्यात येत आहे.

---

## राज्यातील शहरी व ग्रामीण भागातील गोरगरीब व गरजू लाभार्थ्यांसाठी रमाई घरकुल योजनेचा लाभ मिळत नसल्याबाबत

**(२८) ५४००३ (२५-०१-२०२३). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शहरी व ग्रामीण भागातील गोरगरीब व गरजू लाभार्थ्यांसाठी रमाई घरकुल योजना राबविण्यात येत असून शासन निर्णयातील काही जाचक अटींमुळे सदर योजनेचा लाभ गोरगरीब जनतेला मिळत नाही, तसेच बांधकामाकरीता लागणारे साहित्यांच्या किमती वाढल्यामुळे तरतुद असलेल्या अनुदानामध्ये घरकुलांचे बांधकाम पूर्ण होत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेचा लाभ मिळण्यासाठी खाजगी जमिनीवरील घोषित व अघोषित झोपडपट्ट्यांमध्ये रमाई घरकुल आवास योजना राबविण्याचा निर्णय घेण्याबाबत व सदर घरकुल योजनेचे अनुदानाची रक्कम रुपये ७ लाखांपर्यंत करण्याबाबत सोलापूर जिल्ह्यातील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २३ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास मा. मुख्यमंत्री यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या निवेदनाच्या अनुषंगाने खाजगी मालकीच्या जमिनीवरील घोषित अघोषित झोपडपट्टीतील लाभार्थ्यांना रमाई घरकुल आवास योजनेचा लाभ मिळण्यासाठी व या योजनेचे अनुदान रुपये ७ लाखांपर्यंत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे व येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०६-२०२३) :** (१), (२) व (३) शहरी भागातील रमाई आवास योजनेच्या दि.९.३.२०१० रोजीच्या शासन निर्णयातील उर्वरित अटींची पुर्तता करणाऱ्या पात्र लाभार्थ्यांकडून ७/१२ चा उतारा घेण्याची आवश्यकता नाही .सद्यस्थितीमध्ये ज्या लाभार्थ्यांच्या नावे स्वत:च्या मालकीची जागा आहे व दि.१.१.१९९५ रोजी त्यांचे घरकुल/ निवासस्थान सदर जमीनीवर असल्यास आणि त्यांना संरक्षित झोपडीदार म्हणून संरक्षण प्राप्त झालेले असल्यास अशा झोपडीधारकांना रमाई आवास योजना (शहरी) या योजनेंतर्गत घरकुल मंजूर करण्यात येते. मात्र खाजगी

मालकीच्या जागेवर अतिक्रमण करून राहत असलेल्या झोपडीधारकांना रमाई आवास योजनेचा लाभ देण्याबाबत शासनाचे कोणतेही धोरण नाही.

रमाई आवास योजना (ग्रामीण व शहरी) ही केंद्रीय पंतप्रधान आवास योजनेच्या धर्तीवर राज्यात राबविण्यात येते. सदर योजनेच्या अनुदानात कमी-अधिक प्रमाणात सूचना प्राप्त झाल्यानंतर रमाई आवास योजना यामध्ये शासन स्तरावर योग्य तो निर्णय घेतला जाईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत चंद्रपूर शहराच्या पाणीपुरवठा प्रकल्पास मंजूरी मिळण्याबाबत

**(२९) ५४८७८ (२७-०१-२०२३). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत चंद्रपूर शहराच्या पाणी पुरवठा योजनेस शासन निर्णय क्र. अमृत-२०१६/प्र.क्र.३९४ (४)/नवि-३३ दिनांक २७/१०/२०१६ अन्वये रु.२२७.९६ कोटी किंमतीच्या आराखडयास मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानंतर या प्रकल्पाच्या उपांगामध्ये झालेल्या बदलाच्या अनुषंगाने शासन निर्णय क्र.अमृत-२०१६/प्र.क्र.३९४ (४)/नवि-३३ दिनांक २१/१२/२०१८ अन्वये रु.२३४.९५ कोटी रक्कमेस सुधारित मान्यता प्रदान करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त योजना पूर्ण क्षमतेने कार्यरत होण्याकरिता व लाभार्थी नागरिकांना या योजनेचा लाभ योग्यरितीने मिळण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३१-०५-२०२३) :** (१) व (२) होय हे खरे आहे.

(३) व (४) केंद्र पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत चंद्रपूर शहराच्या पाणीपुरवठा प्रकल्पास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यात आलेली आहे. सदर प्रकल्पाकरिता वन विभाग, महाऔष्णिक विद्युत केंद्र, सार्वजनिक बांधकाम विभाग, रेल्वे विभाग, राष्ट्रीय महामार्ग विभाग अशा विविध विभागांच्या परवानग्या मिळण्यास विलंब तसेच, कोव्हीड महामारीमुळे उद्भवलेल्या परिस्थितीमुळे कामाच्या गतीवर परिणाम झाला.

सद्यस्थितीस सदर प्रकल्पाचे काम भौतिकदृष्ट्या ९५% पूर्ण झालेले आहे. सदर योजनेंतर्गत प्रस्तावित बहुतांशी कामे पूर्ण झालेली असून योजना पूर्ण करण्याचे काम वेगाने सुरु आहे. सदर प्रकल्प कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने झोन निहाय कामे पूर्ण करून चाचणी घेण्यात येत आहेत. टप्प्याटप्प्याने झोनचा पाणीपुरवठा चंद्रपूर महानगरपालिकेमार्फत सुरु करण्यात येत आहे.

---

### राज्य परिवहन महामंडळ, ठाणे विभागात वाहक प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या कर्मचाऱ्यांना अंतिम वाहनचालक चाचणी घेऊन नोकरीत सामावून घेण्याबाबत

**(३०) ५५०८७ (२२-०१-२०२३). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य परिवहन महामंडळात ठाणे विभागात ४८ दिवसांचे चालक व १५ दिवसांचे वाहक प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या कर्मचाऱ्यांना अंतिम वाहनचालक चाचणी घेऊन नोकरीत सामावून घेण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २९ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना लेखी निवेदन दिले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त लेखी निवेदनानुसार शासनाने या कर्मचाऱ्यांना नोकरीत सामावून घेण्याबाबत कोणता निर्णय घेतला आहे, व त्याचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०१-०६-२०२३) :** (१) होय.

(२), (३) सरळसेवा भरती सन २०१६-१७ अंतर्गत चालक तथा वाहक पदाच्या निवड यादीवरील उमेदवारांना नेमणूक देण्याबाबत विभागांना सूचना देण्यात आल्या आहेत.

त्यानुसार, रा.प.ठाणे विभागात निवड यादीवरील ४८ दिवसांचे चालक पदातील व १५ दिवसांचे वाहक पदाचे प्रशिक्षण पुर्ण केलेले ०७ उमेदवार आहेत. सदर ०७ उमेदवारांचे सेवापुर्व प्रशिक्षणास ०१ वर्षापेक्षा जास्त कालावधी झाल्याने, त्यांना ०६ दिवसांचे उजळणी प्रशिक्षणाकरीता बोलविण्यात आले होते. सदर ०७ उमेदवारांपैकी ०४ उमेदवार हजर झाले असून, त्यांना ०६ दिवसांचे उजळणी प्रशिक्षण देण्यात आले आहे. उर्वरीत ०३ उमेदवारांपैकी ०२ उमेदवार गैरहजर राहिले आहेत. सदर गैरहजर उमेदवारांना हजर राहणेकरीता ०१ संधी देण्यात आली आहे व ०१ उमेदवार हे विलंबाने हजर झाले असल्याने त्यांना वैद्यकीय तपासणीकरीता पाठविण्यात आले आहे.

---

## लातूर शहर महानगरपालिका, लातूर अंतर्गत कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांना सातवा वेतन लागू नसल्याबाबत

**(३१) ५५५६९ (२७-०१-२०२३). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर शहर महानगरपालिका, लातूर अंतर्गत कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांना सातवा वेतन आयोग लागू करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री महोदय यांच्याकडे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदरील मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०५-०६-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) लातूर शहर महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचारी यांना सातवा वेतन आयोग लागू करण्यासंदर्भात नगर विकास विभाग, शासन निर्णय, दिनांक ६.१२.२०२२ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भूकंपग्रस्त प्रवर्गासाठी अन्यायकारक असलेला शासन निर्णय रद्द करण्याबाबत

**(३२) ५५६१० (२४-०१-२०२३). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय सेवेत भूकंपग्रस्त राखीव जागेवर भूकंपग्रस्त प्रवर्गाचे पात्र उमेदवार उपलब्ध नसल्याने ती पदे प्रकल्पग्रस्तांसाठी वापरण्याबाबत भूकंपग्रस्त प्रवर्गातील उमेदवारांसाठी अन्यायकारक असलेला सामान्य प्रशासन विभागाचा दिनांक ४ नोव्हेंबर, २०१६ रोजीचा शासन निर्णय रद्द करण्याबाबत औसा विधानसभा स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्री महोदय,मा.उपमुख्यमंत्री महोदय, व मा.महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे निवेदनाव्दारे मागणी केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदरील मागणीच्या अनुषंगाने शासनाने उक्त शासन निर्णय रद्द करण्याबाबत व भूकंपग्रस्त प्रवर्गातील राज्य शासनाच्या सर्व शासकीय व निमशासकीय विभागातील सर्व रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) असल्यास, उक्त प्रकरणी राज्य शासनच्या शासकीय व निमशासकीय विभागात भूकंपग्रस्त प्रवर्गातील किती पदे रिक्त आहेत व सदरील सर्व पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०६-२०२३) :** (१) हो, हे खरे आहे.
(२) व (३) दि.४.११.२०१६ रोजीचा शासन निर्णय रद्द करणे उचित होणार नसल्याबाबत मा. सदस्यांना दि.२६.०५.२०२३ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. भूंकपग्रस्तांचे आरक्षण हे समांतर आरक्षण असल्याने, सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयातील भूंकपग्रस्तांची पदे संबंधित विभागाकडून, संबंधित निवड प्राधिकरणांकडून भरण्यात येतात.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### केज (जि.बीड) या शहराचा अमृत टप्पा-२ अंतर्गत पाणीपुरवठा योजनेत समावेश करण्याबाबत

**(३३) ५६३५५ (१८-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केज (जि. बीड) शहराची सध्याची लोकसंख्या जवळपास ६० हजार असून, या शहराला गत ३५ वर्षापासून केज धारुर येथील बारा गावांना पाणीपुरवठा योजनेतून पाणीपुरवठा होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजना ग्रामपंचायत असतांना करण्यात आली असून, सद्य:स्थिती उक्त योजना कालबाह्य झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यामुळे या ठिकाणी आता नगरपंचायत असल्याने या शहरास १२ ते १५ दिवसाआड पाणीपुरवठा करण्यात येत असलेला पाणीपुरवठा कमी पडत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी केज शहरासाठी अमृत टप्पा-२ अंतर्गत पाणीपुरवठा योजनेत समावेश करुन मंजुरी देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी नगरविकास मंत्री यांचेकडे दिनांक १४ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३१-०५-२०२३) :** (१), (२), (३) व (४) केज शहराची लोकसंख्या सन २०११ च्या जनगणनेनुसार ३०,७०४ एवढी आहे. तसेच, सध्याची अंदाजित लोकसंख्या ३७,९९५ एवढी आहे.
केज शहरास सद्यस्थितीस केज धारूर व बारा गावे प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेतून पाणीपुरवठा होत असून सदर योजना ही सन १९९६ वर्षी कार्यान्वित झालेली आहे. सदर योजना ग्रामपंचायतकालीन असून कार्यान्वित होऊन २६ वर्षे झालेली आहेत.
सदर योजना जुनी झालेली असल्यामुळे पाणी गळती, कमी दाबाने पाणीपुरवठा, वाढलेल्या शहराच्या भागामध्ये वितरण व्यवस्थेचा अभाव यामुळे व्यवस्थित पाणीपुरवठा होण्यास अडचणी येत आहेत.
केज नगरपंचायतमार्फत नवीन पाणीपुरवठा योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आलेला असून केज नगरपंचायतच्या पाणी पुरवठा प्रकल्पाच्या अनुषंगाने आवश्यक माहिती केज नगरपंचायतमार्फत केंद्र शासनाच्या अमृत २.० च्या पोर्टलवर भरण्यात आलेली असून सदर पाणीपुरवठा प्रकल्प अमृत २.० अभियानांतर्गत गठीत करण्यात आलेल्या राज्यस्तरीय उच्चाधिकार सुकाणू समितीसमोर सादर करण्यात येईल किंवा महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियानांतर्गत विचारात घेण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### आर्थिक दुर्बल घटकांकरीता आर्थिक सहाय्य योजना राबविण्याबाबत

**(३४) ५६५०४ (२६-०४-२०२३). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.अजित पवार (बारामती), श्री.छगन भुजबळ (येवला), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय
(१) राज्यातील आर्थिक व दुर्बल घटकांना आर्थिक सहाय्य करण्यासाठी सामाजिक न्याय विभागाच्या माध्यमातून संजय

गांधी निराधार योजना, श्रावणबाळ सेवा योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तिवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तिवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्ती योजना या पाच योजना राज्यात राबविल्या जात असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात सदरील योजनांसाठी राज्य शासनाच्या योजनांचे २२ लाख ८७ हजार तर केंद्र शासन पुरस्कृत योजनांचे १२ लाख २१ हजार ६०० असे एकूण जवळपास ३५ लाख ८ हजार ६०० हून अधिक लाभार्थी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार सदरील योजनांच्या लाभार्थ्यामध्ये जेष्ठ नागरिक, दिव्यांग ,विधवा महिला यांचे प्रमाण बघता सदरील लाभार्थ्यांना आर्थिक सहाय्याची रक्कम पोस्टाच्या माध्यमातून रोख स्वरूपात घरपोच देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०६-२०२३) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) विशेष सहाय्य योजनेतील पात्र लाभार्थ्यांना अर्थसहाय्याचे वितरण लाभार्थ्यांनी उघडलेल्या जवळच्या बँक खाते/ पोस्ट बचत खात्यात करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात १८ वर्षांपेक्षा जास्त वयाच्या अनाथांना दरमहा एक हजार रुपये देण्याची योजना खाजगी संस्थामार्फत राबविण्याबाबत

**(३५) ५६६४७ (२६-०४-२०२३). श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात १८ वर्षांपेक्षा जास्त वयाच्या अनाथांना दरमहा एक हजार रुपये देण्याची योजना खाजगी संस्थामार्फत राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासन वेगवेगळ्या विभागांच्या यंत्रणा अशा स्वरूपाच्या योजना सक्षमपणे राबवत असतानासुद्धा सदर योजना कार्यान्वित करण्याचे काम खाजगी संस्थेकडे देण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त अन्य काही संस्थांचे/संघटनांचे प्रस्ताव प्राप्त झाले होते काय, व ते नाकारण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी पात्र अनाथांच्या प्रस्तावास मान्यता प्राप्त होण्याकरिता व प्रत्यक्ष रक्कम अदा करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०६-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३), (४), (५) व (६) महसूल व वन विभागाकडून प्राप्त प्रस्तावानुसार संजय गांधी निराधार अनुदान योजनेतील पात्र अनाथ मुलांना योजनेचा लाभ मिळण्याच्या संदर्भात तर्पण फाऊंडेशन या संस्थेसोबत त्रिपक्षीय करारनामा करण्यात आला आहे. सदर संस्था अनाथ मुलांच्या उत्थानासाठी कार्यरत असून राज्यभरातील पात्र अनाथ मुलांना योजनेचा लाभ मिळावा यासाठी शासनाकडून कोणत्याही स्वरुपाच्या आर्थिक मदतीशिवाय तर्पण ही संस्था कार्य करणार आहे.

---

## दिनांक १० जानेवारी, २०२३ रोजी निर्गमित केलेला शासन निर्णय सुधारित करण्याबाबत

**(३६) ५६७१५ (२८-०४-२०२३). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.अजित पवार (बारामती), श्री.धनंजय मुंडे (परळी), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.विनोद निकोले (डहाणू), कुमारी आदिती तटकरे (श्रीवर्धन), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा.मुख्यमंत्री/मा.उपमुख्मंत्री/मा.मंत्री यांना लोकप्रतिनिधी तसेच इतर मान्यवर व सर्वसामान्य नागरिक यांचेकडून प्राप्त होणारी पत्रे/निवेदने यावरील सामासिक निर्देशानुसार विभागीय प्रमुख यांचेस्तरावर परस्पर आदेश निर्गमित केल्यामुळे शासनाने अशा प्रकरणात करावयाच्या कार्यवाहीबद्दल दिनांक १० जानेवारी, २०२३ रोजी शासन निर्णय निर्गमित केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे सामासिक निर्देशानुसार मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री याचे शेरे प्रकरणाविषयी अंतिम निर्णय समजण्यात येऊ नये, अशा प्रकारे शासन निर्णय निर्गमित करुन मा.मंत्री महोदयांच्या निर्णय क्षमता, गुणवत्ता, सारासार विचार, विवेक, हेतू आणि भारतीय संविधानाने स्थापित लोकशाही मधील लोकनियुक्त सरकारच्या अधिकारावर शंका उपस्थित केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, मंत्री महोदयांकडून कोणताही तर्क, निर्णय क्षमता, गुणवत्ता, सारासार विचार, विवेक यांचा वापर केल्याशिवाय सामासिक निर्देश नोंदविले जातात काय,

(४) असल्यास, प्रश्न भाग (२) मधील मुद्दाप्रमाणे सदर शासन निर्णय सुधारित करण्याबाबत सरकारने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०१-०६-२०२३) :** (१) होय.

(२) व (३) नाही.

(४) सदर शासन निर्णय शासन मान्यतेने निर्गमित करण्यात आला असून सुधारित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कळवा (जि.ठाणे) परिसरातील वाहतुक कोंडी सोडविण्यासाठी ठाणे-कल्याण रेल्वे मार्गावरील उड्डाणपुलाचे काम करण्याबाबत

**(३७) ५६७२८ (२४-०४-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :**सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय

(१) कळवा (जि.ठाणे) परिसरातील वाहतुक कोंडी सोडविण्यासाठी कळवा खाडीवर उभारण्यात आलेल्या पूलाचा रेल्वे लाईन क्रॉस करुन पटनी मैदानापर्यंत विस्तार करण्यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ९ जानेवारी, २०२३ तसेच वारंवार मा.मुख्यमंत्री व आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचेकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार ठाणे-कल्याण रल्वे मार्गावरील उड्डाणपुलाचे काम करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-०६-२०२३) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) ठाणे महानगरपालिकेमार्फत नव्याने उभारण्यात आलेल्या कळवा खाडी पुलाचा पटणी मैदानापर्यंत विस्तार करण्याबाबतचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे दि.०४.०५.२०२३

रोजी सादर केला आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील वाहतुक कोंडी सोडविण्यासाठी श्रीनगर ते गायमुख हिल रस्त्याचे काम पूर्ण करण्याबाबत

**(३८) ५६७२९ (२४-०४-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील मुख्य रस्त्यांवर होणाऱ्या वाहतुक कोंडीचा विचार करता येऊर डोंगर पायथ्याजवळ संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या हद्दीलगत श्रीनगर ते गायमुख घोडबंदर दरम्यान मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या माध्यमातुन हिल रस्ता उभारण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पाचे स्वरुप काय आहे,
(३) तसेच ठाणे महापालिका क्षेत्रातील मुख्य रस्त्यांवर दैनंदिन होणारी वाहतुक कोंडी सोडविण्याच्या दृष्टीने महत्वपुर्ण असलेल्या श्रीनगर ते गायमुख हिल रस्त्याचे काम लवकरात लवकर पुर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-०६-२०२३) :**(१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) वर्सोवा, मुंबई येथील जोगेश्वरी-विक्रोळी लिंक मार्गावर जोगेश्वरी रेल्वे मार्गावरुन जाण्याकरीता हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे उड्डाणपूलाचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत पूर्ण करुन सप्टेंबर, २०१५ मध्ये वाहतूकीस खुला करण्यात आला आहे. याच मार्गालगत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत मेट्रो ६ (स्वामी समर्थ नगर - विक्रोळी) या मार्गाचे नियोजन करण्यात आले. मेट्रो मार्ग क्र ६ च्या रेखाकनांमध्ये अस्तित्वात असलेला हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे मार्गालगत येत असल्याने सदरहू उड्डाणपुल व मेट्रो प्रकल्प यामध्ये एकसूत्रीकरण राहण्यासाठी उड्डाणपुलाचे काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्याचे ठरविण्यात आले. त्यामुळे इन्फिनिटी मॉल ते महाकाली केव्हज या ५.०७ कि.मी हा मार्गापैकी २.५८ कि.मी. लांबीचा मार्ग दुमजली उड्डाणपुलाने (वरती मेट्रो, खाली उड्डाणपुल व त्या खाली रस्ता ) जोडण्याचा निर्णय घेतला. सद्यस्थितीत इन्फिनिटी मॉल ते मिल्लत स्कूल व महाकाली केव्हज ते पश्चिम द्रुतगती मार्ग पर्यंत दुमजली उड्डाणपुलाचे काम सुरु असून ५० टक्के काम पूर्ण झाले आहे.

प्राधिकरणामार्फत मेट्रो मार्ग क्र ६ वर सुरु असलेल्या दुमजली उड्डाणपुलास अस्तित्वात असलेल्या हिदुहृदयसम्राट मा. बाळासाहेब ठाकरे उड्डाणपुलाला पश्चिमेस मिल्लत स्कूल जवळ व पूर्व दिशेस पश्चिम द्रुतगती मार्गावरुन जेव्हीएलआर कडे जाणारा मार्ग केबल स्टेड (cable stayed) प्रकारच्या उड्डाणपुलाने जोडण्याचे नियोजित आहे. सदरहू कामासाठी रुपये ३८४.५० कोटी निधी बृहन्मुंबई महानगरपालिकेने प्राधिकरणाकडे वर्ग केलेला आहे. सदरहू काम सुरु करण्यासाठी निविदा प्रक्रियेची कार्यवाही प्राधिकरणामार्फत प्रगतीपथावर आहे. सद्यस्थितीत काम सुरु असलेल्या मेट्रो मार्ग क्र ६ व दुमजली उड्डाणपुलाच्या जोडणी कामामुळे या भागात काही प्रमाणात वाहतुक कोंडी होत आहे. सदरहू वाहतूक कोंडीवर आवश्यक त्या उपाययोजना प्राधिकरणामार्फत करण्यात येत आहे.

---

**ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील रायलादेवी तलावाच्या सुशोभिकरणाचे काम पूर्ण करण्याबाबत**

**(३९) ५६७३० (२४-०४-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील रायलादेवी तलावाच्या सुशोभिकरणासाठीच्या ३९ कोटी रुपयांच्या प्रस्तावास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मान्यता दिलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पाचे स्वरुप काय आहे व त्यानुसार कोट्यावधी रुपये खर्चूनही दुरवस्थेत असलेल्या रायलादेवी तलावाच्या सुशोभिकरणाचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३१-०५-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकल्पाअंतर्गत तलावाच्या पाणथळ व भोवतालच्या भागाच्या बाहेरील भागाचे सुशोभिकरण करण्यात येणार आहे. त्यामध्ये विहार क्षेत्र, सांस्कृतिक उद्यान, प्रेक्षागृह, प्रशासकीय इमारत, तलावाभोवती कुंपण भिंत बांधणे, मुलांना खेळण्याकरिता सुविधा इत्यादी कामांचा समावेश आहे. तसेच याच परिसरात असलेल्या संकल्प चौक येथे मुक्त रंगमंच व परिसराचे सुशोभिकरणाचा देखिल यामध्ये समावेश आहे. सदर कामास दि.१७.१०.२०२२ रोजी कार्यादेश देऊन कामास सुरुवात करण्यात आली आहे. सद्यस्थितीत २०% काम पूर्ण झालेले आहे. सद्यस्थितीत कामे प्रगतीत आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे जिल्ह्यातील कोपरी-पटनी दरम्यान मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या माध्यमातुन नवीन खाडी पूल उभारण्याबाबत**

**(४०) ५६७३४ (२४-०४-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, ठाणे आणि परिसरातील वाहतुकीची समस्या सोडविण्यासाठी मुंबई ईस्टर्न फ्री-वे हा रस्ता घाटकोपर येथुन ठाणे मार्गे फाऊंटन (घोडबंदर रोड) दरम्यान विस्तार करण्याचा निर्णय मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने घेतलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच ठाणे येथील कोपरी-पटनी दरम्यान मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या माध्यमातुन नवीन खाडी पूलाची उभारणी करण्यात येणार आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) मधील प्रकरणी शासनाने घेतलेल्या निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व सदरची कामे लवकरात लवकर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-०६-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) प्रश्न भाग (१) बाबत - मुंबई इस्टर्न फ्रि वे रस्त्याचे छेडानगर, घाटकोपर ते आनंदनगर, ठाणे पर्यंत विस्तारीकरण करणे, आनंदनगर ते साकेत उन्नत मार्गाचे बांधकाम करणे, बाळकुंभ ते गायमुख ठाणे खाडी किनारा मार्गाचे बांधकाम करणे व गायमुख ते फाऊंटन हॉटेल पर्यंत ठाणे खाडी किनारा मार्गाचे विस्तारीकरण करणे ही कामे प्राधिकरणामार्फत प्रस्तावित करण्यात आली आहेत, यापैकी आनंदनगर ते साकेत आणि ठाणे खाडी किनारा मार्ग या प्रकल्पांना प्राधिकरणाच्या दि.१६.११.२०२१ रोजी पार पडलेल्या १५१ व्या बैठकीत प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. यामधील, मुंबई इस्टर्न फ्रि वे रस्त्याचे छेडानगर, घाटकोपर ते आनंदनगर, आनंदनगर ते साकेत या कामाकरीता सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी सल्लागारांची नेमणूक करण्यात आली आहे त्यांच्यामार्फत याबाबतची कार्यवाही सुरू आहे.

बाळकुंभ ते गायमुख ठाणे खाडी किनारा मार्गाचे बांधकामाकरीता सुधारित अंदाजपत्रकीय रक्कम रु. २६७४ कोटी यास प्राधिकरणाच्या १५४ व्या बैठकीत दि. १०.०३.२०२३ रोजी मान्यता घेण्यात आली आहे. तसेच सल्लागाराची नेमणूक करण्यात आलेली असून अंदाजपत्रके निविदा तयार करणेचे काम सुरु आहे.

गायमुख ते फाऊंटन हॉटेल पर्यंत ठाणे खाडी किनार मार्गाचे विस्तारिकरणाच्या कामासाठी रस्त्याच्या याच भागात गायमुख ते काशिमिरा या मेट्रो मार्गाचे काम प्राधिकरणाकडून प्रस्तावित असून मेट्रो व उन्नत मार्गाचे बांधकाम संयुक्तपणे प्राधिकरणाच्या मेट्रो विभागामार्फत करण्याचे नियोजन आहे. त्या अनुषंगाने मेट्रोच्या सल्लागारामार्फत कार्यवाही सुरु आहे.

प्रश्न भाग (२) बाबत - ठाणे येथील कोपरी ते पटनी दरम्यान नवीन खाडी पुलाची उभारणी करण्याकरीता सदर कामाची तांत्रिक व्यवहार्यता तपासणे, विस्तृत प्रकल्प अहवाल बनवणे तसेच बांधकामाकरिता कंत्राटदार नियुक्तीसाठी निविदा प्रपत्रे तयार करणे इत्यादी करिता सल्लागारांची नेमणुक करणेसाठी प्राधिकरण सभेच्या दि.२०.१०.२०२२ रोजीच्या १५३ व्या बैठकीत प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

त्यानुसार कामाची तांत्रिक व्यवहार्यता तपासणे, विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करणे तसेच प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार व कंत्राटदार नेमणूकीसाठीची निविदा प्रपत्रे तयार करणे इत्यादीसाठी प्रकल्प अहवाल सल्लागाराच्या नियुक्तीचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पालघर जिल्ह्यातील वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या आरोग्य संस्थांमध्ये शवागार आणि शवविच्छेदन गृहाबाबत

**(४१) ५६८०७ (११-०५-२०२३). श्री.सुनील राणे (बोरीवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या आरोग्य संस्थांमध्ये शवागार आणि शवविच्छेदन गृह स्थापन करण्याची मागणी प्रहार जनशक्ती पक्षाच्या विरार येथील पदाधिकाऱ्यांनी दिनांक १३ एप्रिल, २०२२, दिनांक ८ ऑगस्ट, २०२२ आणि दिनांक २३ ऑगस्ट, २०२२ रोजी आयुक्त वसई-विरार शहर महानगरपालिका यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या रुग्णालयात शवविच्छेदन करीता न्यायवैद्यकशास्त्र तज्ञ वैद्यकीय अधिकारी यांची पदे मंजूर करण्याची मागणी आयुक्त, वसई-विरार शहर यांनी दिनांक ४ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या आरोग्य संस्थांमध्ये शवागार आणि शवविच्छेदन गृह स्थापन करून त्याठिकाणी आवश्यकतेनुसार वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या नेमणूक करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-०६-२०२३) :** (१) अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाले ही वस्तुस्थिती आहे.

(२) व (३) वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या सर डी.एम.पेटीट रुग्णालय, श्री.जीवदानी देवी रुग्णालय व सोपारा सामान्य रुग्णालय या तीन ठिकाणी शवागृह स्थापन करण्यात आले असून त्याठिकाणी शवविच्छेदन करण्याकरिता न्यायवैद्यकशास्त्र तज्ञ या अधिकाऱ्याची आवश्यकता आहे.

तद्नुषंगाने वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर न्यायवैद्यकशास्त्र तज्ञ संवर्गातील २ पदे मंजूर असून सदर पदे रिक्त असल्याने न्यायवैद्यकशास्त्र तज्ञ-१, वैद्यकीय अधिकाऱ्याची प्रतिनियुक्ती करण्याकरिता महानगरपालिका स्तरावरून आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांना प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

तसेच सदर पदाची निकड लक्षात घेता, सबंधित अधिकाऱ्याची प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्याबाबत सार्वजनिक आरोग्य विभागास कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कळवा (जि.ठाणे) येथील मनिषानगर भागातील इमारतीचा स्लॅब कोसळून ३ व्यक्ती गंभीर जखमी झाल्याबाबत**

**(४२) ५६८५५ (२४-०४-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे महानगरपालिका क्षेत्रात कळवा येथील मनिषानगर भागातील विक्रांत ४३ या इमारतीमधील एका सदनिकेचा स्लॅब कोसळून ३ व्यक्ती गंभीर जखमी झाल्याची दूर्घटना दिनांक ३१ आक्टोबर, २०२२ रोजी वा सुमारास घडली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने मोडकळीस आलेल्या इमारतींमधील रहिवाशांच्या सुरक्षिततेसाठी तसेच धोकादायक इमारतींच्या पुनर्बांधणी संदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३१-०५-२०२३) :** (१), (२) व (३) अशा प्रकारची घटना घडली आहे ही वस्तुस्थिती आहे.
ठाणे महानगरपालिकेने कळविल्यानुसार संबंधित गृहनिर्माण संस्थेस इमारत रहिवास / वाणिज्य वापर बंद करुन स्ट्रक्चरल ऑडीट करण्याकरिता दिनांक ३१.१०.२०२२ नोटीस बजाविण्यात आली आहे. तसेच इमारतीच्या तळमजल्यावरील वापर पुर्णत: प्रतिबंधित करण्यात आला आहे.
तथापि, सबंधित गृहनिर्माण संस्थेने उक्त इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट करुन घेतले आहे. सदर इमारत सी-२ ए वर्गवारीत दर्शविण्यात आली असून त्यानुसार पुढील कार्यवाही सुरु असल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे महापालिका क्षेत्रातील वाहतुकीची प्रचंड वर्दळ असलेल्या तीनहात नाका येथे वाहतुक सुधारणा प्रकल्पाचे काम करण्याबाबत**

**(४३) ५६८६१ (२६-०४-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :**सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-
(१) ठाणे महापालिका क्षेत्रातील वाहतुकीची प्रचंड वर्दळ असलेल्या तीनहात नाका येथे वाहतुक सुधारणा प्रकल्पासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने २८९ कोटी रुपयांच्या प्रकल्पास मान्यता दिलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, त्यानुषंगाने उक्त परिसरातील वाहतुकीच्या दृष्टीने महत्वपूर्ण असलेल्या प्रकल्पाचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-०६-२०२३) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) तीन हात नाका जंक्शन येथे होणारी वाहतुक कोंडी सोडवण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत भूयारी मार्गिकेचे बांधकाम करण्यात येत असून प्रस्तावित भूयारी मार्गाची लांबी १.०८५ किमी तर रुंदी

१२.०० मी. इतकी असणार आहे. सदर कामाचे सविस्तर अंदाजपत्रक तयार करुन कंत्राटदाराची नेमणूक करण्यासाठी निविदा प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे महानगरपालिकेच्या वतीने बांधण्यात येणाऱ्या बालभारती ते पौड रस्त्याच्या कामाबाबत

**(४४) ५६९०४ (२४-०४-२०२३). श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महानगरपालिकेच्या वतीने बांधण्यात येणाऱ्या बालभारती ते पौड रस्त्याच्या कामाकरीता सल्लागार समिती नियुक्त केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर समितीचे स्वरुप काय आहे, यामध्ये एकूण किती आणि कोणकोणत्या सदस्यांचा अंर्तभाव करण्यात आलेला आहे तसेच या रस्त्यांच्या कामासाठी एकूण किती खर्च अपेक्षित आहे,
(३) असल्यास, उक्त स्थापित केलेल्या समितीने आपला अहवाल महानगरपालिकेस सादर केला आहे काय व त्यातील शिफारशी / सूचनांचा सर्वसाधारण तपशिल काय आहे,
(४) असल्यास, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०६-२०२३) :**(१) होय, खरे आहे.
(२) बालभारती ते पौड फाटा या कामासाठी खालील प्रमाणे सल्लागार समिती गठित करण्यात आलेली आहे.
अ. इन्हारमेंटल इन्पॅक्ट स्टडी.
१. अति.महापालिका आयुक्त (वि)- अध्यक्ष.
२. मुख्य अभियंता (प्रकल्प) - सदस्य.
३. मुख्य अभियंता (पथ) - सदस्य.
४. कार्यकारी अभियंता (इनव्हायरमेंट) - सदस्य
५. एन.जी.ओ.- २ प्रतिनिधी.
ब. ट्रॅफिक इम्पॅक्ट स्टडी.
१. अति.महापालिका आयुक्त (वि)- अध्यक्ष.
२. मुख्य अभियंता (प्रकल्प) - सदस्य.
३. मुख्य अभियंता (पथ) - सदस्य.
४. एन.जी.ओ.- २ प्रतिनिधी.
या रस्त्यासाठी एकुण र.रु.२५२.०० कोटी (जीएसटी, रॉयल्टी, टेस्टींग वगळून) एवढा खर्च अपेक्षित आहे.
(३) समितीच्या निर्देशानुसार इन्व्हारमेंटल इम्पॅक्ट स्टडी व ट्रॅफिक इम्पॅक्ट स्टडीचे अहवाल समितीकडे सादर करण्यात आले होते. सदर अहवालावर वेळोवेळी सादरीकरण तसेच एनजीओचे प्रतिनिधी बरोबर चर्चा करण्यात आली आहे. तथापी एनजीओ च्या २ प्रतिनिधींनी सदरचे प्रकल्पामुळे होणा-या पर्यावरण विषयक परिणामांविषयी विरोधी मत व्यक्त केले आहे. तथापी समितीतील बहुतांश सदस्यांचे म्हणण्याप्रमाणे रस्ता करणे आवश्यक असल्याने प्रकल्पाचे सविस्तर अहवाल करणे, पूर्वगणनपत्रक तयार करणेची प्रक्रिया राबविण्यात आली आहे.
(४) बालभारती ते पौड फाटा रस्त्याचा डी.पी.आर.तयार करणेत आलेला आहे. डीपीआर च्या अनुषंगाने पूर्वगणनपत्रक तयार करणेत आलेले असून सदरच्या पूर्वगणनपत्रकास सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्य परिवहन विभागाचे प्रमाणपत्र न घेताच वाहने मुंबईच्या रस्त्यावरून धावत असल्याबाबत**

**(४५) ५६९७४ (२६-०४-२०२३). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य परिवहन विभागाचे प्रमाणपत्र न घेताच तब्बल ३० हजार वाहने मुंबईच्या रस्त्यावरून धावत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, फिटनेस चाचणी न करणाऱ्या वाहनांवर उपप्रादेशिक परिवहन विभागाकडून कोणतीही कारवाई होत नसल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुंषगाने वाहनांची फिटनेस चाचणी करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२६-०५-२०२३) :** (१) दिनांक १४.०१.२०२३ रोजी वृत्तपत्रामध्ये अशा आशयाची बातमी प्रसिध्द झाली आहे.

(२) नाही.

(३) प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या वायुवेग पथकामार्फत योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरण न करता वापरल्या जाणा-या वाहनांची वेळोवेळी तपासणी करुन मोटार वाहन अधिनियम व त्या अंतर्गत नियमातील तरतुदी नुसार कारवाई करण्यात येते.

माहे एप्रिल २०२२ ते जानेवारी २०२३ या कालावधीत योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरण न करता वापरल्या जाणाऱ्या वाहनांवर केलेल्या कारवाईचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| कार्यालयाचे नाव | दोषी वाहने | दंड वसुली(रु.) |
|---|---|---|
| प्रा.परिवहन कार्यालय, मुंबई (मध्य) | ८९२ | ३७,४०,००० |
| प्रा. परिवहन कार्यालय, मुंबई (पश्चिम) | १०८९ | ३५,५५,००० |
| प्रा.परिवहन कार्यालय, मुंबई (पूर्व) | २२८६ | ४२,५८,५०० |
| उप प्रा. परिवहन कार्यालय, बोरीवली | ७८० | २,७३,००० |

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्हयातील अनुसूचित जाती व नवबौध्द विकास वस्ती आराखड्यातील कामे प्रलंबित असल्याबाबत**

**(४६) ५७१२० (२६-०४-२०२३). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजेश एकडे (मलकापूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषद, अमरावती समाजकल्याण विभागामार्फत पंचवार्षिक आराखडा तयार केला जात असून सन २०१९ ते २०२३ दरम्यानच्या काळात मागासवर्गीय वस्ती विकास कृती आराखडा प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमरावती जिल्हयातील १४ तालुक्यांमध्ये अनुसूचित जाती व नवबौध्द वस्त्यांमध्ये सन २०२१-२२ मधील विकास आराखड्यामधील एकूण १५ कोटी ३६७ विकास कामांना मंजूरी देण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास याबाबत २४६ म्हणजे सुमारे ६० टक्के कामे पूर्ण झाली असून १२१ म्हणजे ४० टक्के कामे अपूर्णावस्थेत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदरील अपूर्ण कामे तातडीने पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-०६-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२), (३), (४) व (५) अमरावती जिल्ह्यातील १४ तालुक्यांमध्ये अनुसूचित जाती व नवबौध्द वस्त्यांमध्ये सन २०२१-२२ मधील विकास आराखड्यामधील एकूण १५ कोटीच्या ३६५ विकास कामांना प्रशासकीय मंजूरी देण्यात आलेली होती. त्यातील जानेवारी, २०२३ अखेर ११९ कामे अपूर्ण होती. परंतु दि.३१ मार्च, २०२३ अखेर ३६५ मंजूर कामांपैकी ३४९ कामे पूर्ण झाली असून १६ कामे विविध कारणास्तव रद्द झालेली आहे.

---

### राज्यात संजय गांधी निराधार अनुदान ही योजना शासनाने तर्पण या संस्थेकडे सोपविल्याबाबत

**(४७) ५७२५६ (२८-०४-२०२३). श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.धनंजय मुंडे (परळी), कुमारी आदिती तटकरे (श्रीवर्धन), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.विनोद निकोले (डहाणू), अॅड.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :**
सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मागील ४० वर्षांपेक्षा अधिक काळापासून सुरू असलेली संजय गांधी निराधार अनुदान योजना तसेच वैयक्तिक लाभाच्या इतर कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करण्याचे काम सत्तारूढ पक्षाशी संलग्न असलेल्या “तर्पण फाऊडेशन” या संस्थेला देण्यात आलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तर्पण फाउंडेशन या संस्थेला संजय गांधी निराधार योजनेत वंचित राहिलेल्या अनाथ मुला-मुलीं शिवाय संपूर्ण योजनेच्या अंमलबजावणीचे काम देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मागील कित्येक वर्षापासून सुरु असणारी ही योजना तसेच अनाथांना उत्पन्नाचा दाखला देण्याचे अधिकार अचानक खाजगी संस्थेकडे देण्याच्या निर्णयामागे शासकीय अधिकाऱ्यांची अकार्यक्षमता हे मुख्य कारण असल्याचे निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अशा प्रकारचे काम देण्यासंदर्भात शासनाचे धोरण काय आहे,
(५) असल्यास, राज्यात इतरही सार्वजनिक संस्था कार्यरत असतांना सदर योजना एका राजकीय पक्षाच्या तर्पण संस्थेकडे दिल्यामुळे या योजनेच्या लाभार्थ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०६-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३), (४), (५) व (६)
महसूल व वन विभागाकडून प्राप्त प्रस्तावानुसार संजय गांधी निराधार अनुदान योजनेतील पात्र अनाथ मुलांना योजनेचा लाभ मिळण्याच्या संदर्भात तर्पण फाऊंडेशन या संस्थेसोबत दि.१६.०३.२०२३ रोजी त्रिपक्षीय करारनामा करण्यात आला आहे. सदर संस्था अनाथ मुलांच्या उत्थानासाठी कार्यरत असून राज्यभरातील पात्र अनाथ मुलांना योजनेचा लाभ मिळावा यासाठी शासनाकडून कोणत्याही स्वरुपाच्या आर्थिक मदतीशिवाय तर्पण ही संस्था कार्य करणार आहे.

---

## संजय गांधी निराधार अनुदान योजनेअंतर्गत दिले जाणारे अनुदान हे सलग तीन महिने बँकेतून पैसे न काढल्यास बंद करण्याबाबत

**(४८) ५७४८७ (१०-०५-२०२३). श्री.निलेश लंके (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाकडून निराधार अंध, अपंग शारीरिक आजाराने रोगग्रस्त व्यक्ती निराधार विधवा व दुर्बल घटकांसाठी संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावण बाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन योजना व इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंगत्व निवृत्तीवेतन योजना, अशा विविध योजना राबविल्या जात असून आलेल्या योजनांचे लाभार्थी यांना देण्यात येणारे अनुदान हे सलग तीन महिने बँकेतून पैसे न काढल्यास सदरची अनुदानाची रक्कम ही लाभार्थ्यांच्या खात्यातून संबंधित तहसीलदारकडे जमा करण्यात आल्याचा निर्णय घेण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास या योजनेचा लाभ घेणारे लाभार्थी मोठ्या प्रमाणावर वयस्कर तसेच डोंगराळ भागात राहणारे असून अनेक गावात बँक नसल्याने त्यांना शहराच्या ठिकाणी पैसे काढण्यासाठी यावे लागत असल्याने अनेक लाभार्थ्यांना वेळेवर पैसे काढणे शक्य होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत लाभार्थ्यांनी सलग तीन महिने बँकेतून पैसे न काढल्यास सदरचे अनुदान हे तहसीलदारांच्या खात्यात जमा करण्यात यावा असा निर्णय रद्द करण्याबाबत शासन विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुषंगाने उक्त योजनेंतर्गत लाभार्थ्यांना देण्यात येणारे अनुदान बंद तसेच तहसीलदारांच्या खात्यात जमा न करता सदरहू अनुदानाची रक्कम लाभार्थ्यांना मिळणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०६-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

(४) विभागाच्या दिनांक २० ऑगस्ट, २०१९ रोजीच्या शासन निर्णयामध्ये विशेष सहाय्य योजनेतील लाभार्थ्याला लगतचे तीन महिन्यात अर्थसहाय्य बँकेतून उचल करण्याचा कालावधी देण्यात आला असून सदर कालावधी पुरेसा आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये कार्यान्वित करण्यात आलेल्या प्रकल्पामध्ये सातत्याने होत असलेला तांत्रिक बिघाड

**(४९) ५७५०२ (२४-०४-२०२३). श्री.प्राजक्त तनपूरे (राहुरी), श्री.अजित पवार (बारामती), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.धनंजय मुंडे (परळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये Ease of Doing Business (EODB) ची प्रभावी अमंलबजावणी करण्यासाठी कार्यान्वित करण्यात आलेल्या Integrated Web Based Portal प्रकल्पामध्ये सातत्याने तांत्रिक बिघाड होत असल्यामुळे ही संगणक प्रणाली सातत्याने बंद पडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संगणक प्रणालीमध्ये सातत्याने बिघाड होत असल्याने नवीन मालमत्ता नोंद, नवीन नळ जोडणी देणे, मालमत्ता हस्तांतरण, वारस नोंद, बक्षीसपत्र नोंद तसेच लेखा विभागाशी संलग्न सेवा देताना पूर्वीच्या प्रणालीमधील माहिती नवीन प्रणालीमध्ये अद्ययावत न होणे यासारख्या अडचणी येत असल्यामुळे नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संगणक प्रणालीमध्ये आवश्यक दुरूस्ती करण्यासाठी व असे प्रकार पुन्हा घडू नयेत यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०१-०६-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) काही स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अशा बाबी घडल्याचे निदर्शनास आले आहे. तथापि, अशा ठिकाणी दुरुस्तीची कार्यवाही महाआयटीमार्फत चालू आहे.
(३) Integrated Web Based Portal संगणक प्रणालीमध्ये महाआयटी यांचेद्वारे सिस्टीम इंटिग्रेटर यांचेमार्फत वेळोवेळी आवश्यक दुरूस्ती करण्यात येते. तसेच सदर प्रणालीमध्ये उद्भवणाऱ्या त्रूटी दूर करण्यासाठी जिल्हानिहाय २ तांत्रिक मनुष्यबळाची नियुक्ती करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अकोला (जि. अकोला) येथील शिवणी विमानतळ भूसंपादन निधीस मंजुरी मिळण्याबाबत

**(५०) ५७८९२ (२५-०४-२०२३). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला (जि.अकोला) येथील शिवणी विमानतळ विस्तारीकरणाकरीता आवश्यक असलेल्या भूसंपादन मोबदला करीता सुमारे ९८ कोटी रूपये निधी मागणीचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरचा प्रस्तााव शासन मान्यतेसाठी दीर्घ काळापासून मंजुरीकरीता प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुषगाने प्रस्तावास निधी मंजुरी मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०६-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.
(२) (३) व (४)

तत्कालीन मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली दि.०७ फेब्रुवारी, २०२० रोजी बैठक पार पडली. या बैठकीमध्ये अकोला विमानतळाचा व्यवहार्यता अभ्यास अहवाल करण्यास सुचविण्यात आले. त्या अनुषंगाने व्यवहार्यता अभ्यास अहवाल भारतीय विमानपत्तन प्राधिकरण अकोला यांच्याकडून घेवून तो शासनास दि.१३-०९-२०२१ रोजी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीकडून सादर केला आहे. परंतु, सदर अहवालात कोणतीही तांत्रिक शक्याशक्यता नसल्याचे निदर्शनास आल्यामुळे योग्य feasibility report देण्याबाबत भारतीय विमानपत्तन प्राधिकरणास ईमेलद्वारे दि.२४-०९-२०२१ रोजी पुन्हा कळविण्यात आले.

त्या अनुषंगाने दि. ३०-१२-२०२१ रोजी ईमेलद्वारे प्रादेशिक कार्यकारी संचालक (पश्चिम विभाग) आर सी एस अंतर्गत रुट मिळाल्यास तेथील धावपट्टीचे आहे, त्या जागेतच १८०० X ४५ विस्तारीकरण केले जाईल. तथापि, नाईट लॅण्डींग करिता सुमारे ५१.६५ एकर अतिरिक्त जमिनीची आवश्यकता आहे, असे कळविले आहे.

तसेच महाव्यवस्थापक, भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांनी त्यांच्या ईमेलद्वारे उपरोक्त पत्रामध्ये अतिरिक्त भूसंपादनाचे कारण नमूद असल्याने इतर कोणत्याही व्यवहार्यता दर्शक अहवालाची आवश्यकता नसल्याचे कळविले आहे.

दरम्यान, जिल्हाधिकारी अकोला यांचेकडे केंद्रीय मंत्री महोदय मा.श्री.नितिन गडकरी यांचे अध्यक्षतेखाली बैठक पार पडली आणि या बैठकीमध्ये मा.मंत्री महोदयांनी अकोला विमानतळाच्या धावपट्टीचा विस्तार हा २५०० मीटर पर्यंत करावयाचे असल्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार शासनाच्या दि.०२-१२-२०२२ रोजीच्या पत्रान्वये, मा. मंत्री महोदयाचे निर्देश महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी यांच्या निदर्शनास आणले आहेत.

त्यानुसार, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीकडून प्रादेशिक कार्यकारी संचालक (पश्चिम विभाग) भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांना या प्रकल्पाची व्यवहार्यता तपासून अहवाल सादर करण्यास दि.२५-०१-२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. त्याअनुषंगाने त्यांचा अहवाल दि.२७-०३-२०२३ रोजीच्या ई-मेलद्वारे प्राप्त झाला असून, या विमानतळाच्या धावपट्टीचे २५०० मी. पर्यंत विस्तारीकरण शक्य असल्याचे कळविले असून, यासाठी अतिरिक्त १४५ एकर क्षेत्राची आवश्यकता असल्याचे म.वि.वि.कं.ला कळविले आहे.

या १४५ एकर क्षेत्रामध्ये डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापिठाची बहुतांशी जमीन संपादीत करावी लागणार असून, या जमीनीमध्ये सद्यस्थितीमध्ये वसलेली मानवी लोकवस्ती तसेच कृषी अभियांत्रिकी महाविदयालयाच्या इमारती व वसतीगृह इमारतीसह जमीन तात्काळ संपादन करणे शक्य आहे किंवा कसे ? याबाबत जिल्हाधिकारी अकोला यांना विचारणा करण्यात आली आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.